स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade





**Director Board of Examinations and Evaluation**

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com


संदर्भ: जा.क्र. परीक्षा/संपवमूमं/२०१८–१९/१५७

दिनांक : ०२/०५/२०१८

## महत्वाचे परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत पदव्युत्तर महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तर पुस्तिकांचे मुल्यांकन जलद गतीने करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उन्हाळी २०१८ परीक्षेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमातील उत्तरपुस्तिका मुल्यांकनाचे कामकाज, केंद्रीय मुल्यांकन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड व परभणी व लातूर येथील जिल्हा मुल्यांकन केंद्रात सुरू झालेले आहे.

या संदर्भात शिक्षकांना मुल्यांकन/नियमनसाठी आदेश देण्यात आलेले आहेत. हे आदेश प्राचार्यांच्या ई–मेलवर पाठविण्यात आलेले आहेत. करीता संबंधीत शिक्षकांना मुल्यांकन कामासाठी कार्यमुक्त करावे.

या परिपत्रकाव्दारे असे ही कळविण्यात येते की, मा. विद्या परिषदेच्या निर्णयानुसार, पदव्युत्तर स्तरावर शिकवित असलेल्या शिक्षकांना या मुल्यांकन कामात सहभागी होण्यासाठी प्राचार्यांनी शिफारस पत्र संबंधित जिल्हा मुल्यांकन केंद्र प्रमुखांना द्यावे जेणे करुन अशा प्राध्यापकांना मुल्यांकन कामामध्ये सहभागी करुन घेता येईल.

आपणास विदितच आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ८९ नुसार ३० दिवसात निकाल जाहीर करणे बंधनकारक आहे. तसेच याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या कडून निकाल विहित कालावधीतमध्ये जाहीर करणे बाबत आदेश प्राप्त झाले आहेत.

सबब, यांची नोंद घेवून सर्व संबंधित पदव्युत्तर शिक्षकांना मुल्यांकन/नियमन कामासाठी कार्यमुक्त करुन मुल्यांकन/नियमन कार्य गतीमान करावे..

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
१. मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
३. संचालक, केंद्रीय मुल्यांकन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.
३. संचालक, जिल्हा मुल्यांकन केंद्र, परभणी व लातूर.